अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

नोटीस.

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ ( अ ) अन्वये.)

अहमदनगर महानगरपालिका कार्यालय.

दिनांक : १९-१-२००६

श्री./ श्रीमती.......................................

सदस्य,

अहमदनगर महानगरपालिका.

यांस -

याद्वारे कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र.१ ( अ ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक ३१-१-२००६ रोजी दुपारी १.०० वाजता महानगरपालिका सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत : १.विषय पत्रिका व टिपणी.
२.मागील सभेचे इतिवृत्त.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

मंगळवार दि. ३१-१-२००६ रोजी दुपारी १=०० वाजता महानगरपालिका सभागृहांत होणां-या सर्व साधारण सभेपुढील विषय पत्रिका.

| | |
|---|---|
| १ | मागील दिनांक १४-१२-२००५ रोजीच्या झालेल्या खास सभेचे इतिवृत्त कायम करणे |
| २ | दुखवटयाचे प्रस्ताव |
| ३ | मा.राज्य शासनाचे सेवेत १ नोव्हेंबर,२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणां-या कर्मचा-यासाठी नविन अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु करणें बाबतचा दिनांक ३१ ऑक्टोंबर,२००५ चा शासन निर्णय व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. |
| ४ | मुकूंदनगर,फकिरवाडा पाणीपुरवठा योजनांतर्गत ८ इंची पाईप लाईन व १० लाख लिटर्स क्षमतेची उंच पाण्याची टाकी बांधणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ५ | अहमदनगर शहरात रस्ते विकास महामंडळा मार्फत एकात्मिक रस्ते विकास योजना राबविणें बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ६ | नविपेठ शहर सहकारी बँकेजवळील चौकास " सदगुरु शंकर महाराज चौक " असे नामकरण करणें बाबत मा.श्री.अभय आगरकर,नगरसेवक यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. |
| ७ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक : १९-१-२००६.
अहमदनगर.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

मंगळवार दि. ३१-१-२००६ रोजी दुपारी १=०० वाजता महानगरपालिका सभागृहांत होणां-या सर्वसाधारण सभेपुढील विषया बाबतची टिप्पणी.

| अ.नं. | विषय | टिप्पणी |
|---|---|---|
| १ | मागील दिनांक १४-१२-२००५ रोजीच्या झालेल्या खास सभेचे इतिवृत्त कायम करणे | नियमाप्रमाणे आहे.इतिवृत्त कायम करणेंस हरकत नाही. |
| २ | दुखवटयाचे प्रस्ताव | टिप्पणी नाही. |
| ३ | मा.राज्य शासनाचे सेवेत १ नोव्हेंबर,२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणां-या कर्मचा-यासाठी नविन अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु करणें बाबतचा दिनांक ३१ ऑक्टोंबर,२००५ चा शासन निर्णय व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. | अहवालानुसार मा.सभेपुढे माहितीस्तव सादर. |
| ४ | मुकूंदनगर,फकिरवाडा पाणीपुरवठा योजनांतर्गत ८ इंची पाईप लाईन व १० लाख लिटर्स क्षमतेची उंच पाण्याची टाकी बांधणे बाबत ऑफिस रिपोर्ट. | ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव सादर. |
| ५ | अहमदनगर शहरात रस्ते विकास महामंडळा मार्फत एकात्मिक रस्ते विकास योजना राबविणें बाबत ऑफिस रिपोर्ट. | ऑफिस रिपोर्टानुसार मंजुरीस शिफारस आहे. |
| ६ | नविपेठ शहर सहकारी बॅंकेजवळील चौकास " सदगुरु शंकर महाराज चौक " असे नामकरण करणें बाबत मा.श्री.अभय आगरकर,नगरसेवक यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. | मा.सभेने निर्णय घेणेस्तव |
| ७ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. | टिप्पणी नाही |

दिनांक :१९-१-२००६.
अहमदनगर

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : १ दि.३१-१-२००६.

••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••

प्रस्तावाचा विषय - मागील दिनांक १४-१२-२००६ रोजीच्या झालेल्या खास सभेचे इतिवृत्त कायम करणे

--*--

प्रस्तावाचा मजकूर - मागील दिनांक १४-१२-२००६ रोजीच्या झालेल्या खास सभेचे इतिवृत्त कायम करणेसाठी मा.महानगरपालिका सभेपुढे ठेविले.

चर्चा : सभेचे कामकाज सुरु झाले असताना मा.महापौर यांना येण्यास वेळ लागणार असल्याने सभेचे अध्यक्ष म्हणून श्री.सुरेश शेळके,सभागृह नेते यांनी काम पहावे अशाबाबत श्री.नरेंद्र कुलकर्णी, सभापती, स्थायी समिती यांनी प्रस्ताव मांडला. त्यास श्री.दिपक सुळ, नगरसेवक यांनी अनुमोदन दिले.

मागील कार्यवृत्त कायम करण्यास घेतले असता खालीलप्रमाणे चर्चा झाली.

१) मा.श्री.कृ.द.जाधव - मागील मिटींगमधील विषय क्र.४ बाबत सुधारित अंदाजपत्रकामध्ये ३/३ लाख निधी केलेला होता. आता हे आर्थिक वर्ष संपण्यास २ महिनेचा कालावधी राहीलेला आहे. तो निधी अजुन मंजुर झालेला नाही. जो ठराव केला आहे त्याची अंमलबजावणी आर्थिक वर्षात होणार काय? व आमच्या वॉर्डाची कामे या आर्थिक वर्षात होणार काय?

प्रभारी आयुक्त यांनी खुलासा केला की, सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. आढावा घेण्याचे काम चालु असून १-२ दिवसात अंतिम टप्प्यात आहे.

मा.श्री.कृ.द.जाधव - मागील वर्षाच्या निधीचा पैसा उपलब्ध आहे. त्याच निधीमधून कामे करावीत. यावर मा.प्रभारी आयुक्त यांनी खुलासा केला की, जी कामे मंजूर आहेत ती होणार आहेत. ती रोखलेली नाहीत. त्यावर मा.श्री.जाधव यांनी सांगितले की, बोर्डात जे विषय होतात त्याची अंमलबजावणी होत नाही.

२) मा.श्री.दिपक सुळ - प्रत्येक सदस्यांना ३ लाखाचा निधी दिलेला आहे. प्रशासनाने ५० लाख निधी सुचविलेला असताना रु.२ कोटीचा निधी केला. तो थकबाकी देण्यासाठी खर्च करणार काय?

३) मा.श्री.कृ.द.जाधव - २०-२० वर्षाची थकलेली बीले देण्यात आलेली आहेत.

४) मा.श्री.दीप चव्हाण - स्थायी समितीने रु.५० लाखाचा निधी केला असता स्थायी समितीच्या शिफारशीचा विचार करण्यात आला नाही. श्री.सुळ तुम्ही याबाबत सभेत का विचारले नाही?

५) मा.श्री.दिपक सुळ - भुसंपादनाचा निधी वर्ग केला आहे तो परत करण्यात यावा.

६) मा.श्री.कैलास गिरवले - इतिवृत्त दुरुस्त करता येत नाही व ठराव रद्द करता येत नाही असे सांगितले होते. मात्र चुकीचे इतिवृत्त लिहीले असल्यास व चुक झालेली असल्यास दुरुस्ती करता येते.

यावर मा.प्रभारी आयुक्त यांनी सांगितले की, सभेच्या वेळी सभागृहामध्ये जे ठरलेले आहे त्यामध्ये विसंगत लिहीले गेले असेल तर त्यामध्ये बदल होईल असे सुचविले.

७) मा.श्री.अभय आगरकर - महापौर निधी कसा बदलता येतो आकडे बदलू शकत नाही. बजेट मंजुर केले ते ठीक आहे. परंतु नगरसेवकांनी ज्या भुमिका मांडल्या आहे ते स्पष्ट सांगावे. जो बदल केला आहे त्याची आम्हाला माहिती दयावी.

८) मा.श्री.दीप चव्हाण - कुणी काय सुचविले ते सांगावे.

९) मा.श्री.अभय आगरकर - प्रशासनावर आरोप नाही. जी संदिग्धता असेल ती दुर करावी असे मत आहे. जे काही झालेले असेल ते स्पष्ट करावे. व जे काही ठरले असेल ते सभागृहापुढे मांडले जावे. महापौर निधी कमी का झाला? महापौरांनी रुलींग दिल्यानंतर बदलता येते काय?

१०) मा.श्री.मिलींद गंधे - १५५ कोटी देणे आहे. असा शेरा मारलेला आहे. याबाबत प्रशासनाने खुलासा करावा.

११) मा.श्री.कैलास गिरवले - दुरुस्त्या करता येतात तर का करीत नाही?

१२) मा.श्री.सुरेश शेळके - मागील देणे देउन बजेट मंजूर केले होते.

१३) मा.श्री.अशोक कानडे - निधी कोठे खर्च केला त्याच प्रोव्हीजनवर खर्च झाला पाहिजे.

मा.प्रभारी आयुक्त - निधीला कात्री लावलेली नाही. निधीमधील जी बीले येतील त्याप्रमाणे खर्च करावा लागतो. मागील वर्षापर्यंतची १ ते दिड कोटीची बीले शिल्लक आहेत.

१४) मा.श्री.मिलींद गंधे - एवढे मोठे देणे आहे तर विकास कामे करु नका.

१५) मा.श्री.कैलास गिरवले - महापौर निधीतून बीले काढतात ते बेकायदेशीर आहे. सन २००४-०५ चे बजेटमध्ये सुधारणा करणेत आली आहे. यावर प्रभारी आयुक्त यांनी खुलासा केला की, दुरुस्ती करता येत नाही. मागील वेळी चर्चा करुन जे निर्णय घेतले आहेत ते चुकीचे लिहीलेले असतील तरच त्यात दुरुस्ती करता येते.

मा.महापौर - बजेट मध्ये रिॲप्रोप्रिएशनमध्ये ३ लाख निधी केलेला आहे. प्रभारी आयुक्त यांनी सांगितले की, आकडेवारी बघून कोणत्या हेडवर किती बजेट शिल्लक आहे ते पाहून काही कामे मंजुर झालेली आहेत. वर्कऑर्डर देउनही काम सुरु अथवा पूर्ण झालेली नाही. त्यावर मा.श्री.सुळ व गिरवले यांनी अशी कामे कॅन्सल करणेचे सुचविले. प्रभारी आयुकत यांनी सांगितले वर्कऑर्डर देउन ३ महिने पूर्ण झालेले आहेत व काम सुरु केले नाही अशांची यादी करावी. व काम रदद झाल्याचे पत्र दयावे. अशा कामाबाबत २ दिवसात माहिती देउ असे सांगितले. तथापी सदर वेळी सभागृहामध्ये गोंधळ झाला.

१६) मा.श्री.अनंत जोशी - कै.बा.दे.दवाखान्यामध्ये लिफट बसवावी अशी सुचना कोणी मांडली? यावर मा.सौ.सत्रे, सभापती,महिला बालकल्याण समिती यांनी सांगितले की, कोणीतरी याबाबत सुचना केली त्यावेळेस मीच म्हणाले हे काम महिला बाल समितीच्या निधीतून करावे. त्यावर श्री.जोशी यांनी सांगितले की, दवाखान्यामध्ये सर्व सुविधा झाल्याशिवाय लिफट बसवू नये. मात्र सोलर बंब बसवावा. तसेच सावेडी भागामध्ये भुयारी गटार योजनाबाबत तरतुद करावी.

१७) मा.श्री.कृ.द.जाधव - कामाची आवश्यकता, झालेली कामे याबाबत चौकशी करुन अहवाल दयावा. बा.दे.दवाखाना दुरुस्ती करावी. न झालेल्या कामाची कोणती बीले मिळाली हे पुढील मिटींगमध्ये माहिती दयावी. याबाबत मा.प्रभारी आयुक्त यांनी खुलासा केला की अशी प्रकरणे असतील तर त्यावर कारवाई केली जाईल.

१८) मा.श्री.दीप चव्हाण - दि.१४-१२-०५ रोजीच्या मिटींगमध्येच यावर चर्चा झाली असती. बजेटचा खरा विषय त्याच मिटींगपुढे होता.

यानंतर महापौर निधीमधील झालेल्या कामाची यादी वाचून दाखविण्यात आली. यावर मा.महापौर यांनी सांगितले की, याची यादी आपण बोर्डावरही लावू शकतो. १० लाखाची खेळणी बसवली हा संशोधनाचा विषय आहे.

मा.श्री.दीप चव्हाण - महापौर निधीमधून वेगळया कामांची तरतूद केलेली होती. सन २००४-०५ मध्ये जकात हेडवर २४ कोटी ८५ लाखाची तरतूद होती. बजेट मध्ये नवीन हेड करता येत नाही. व पुरवणी बजेट तरतुद करता येत नाही. जकात बजेट तरतूद झिरो होती. ती वाढविता येते काय? बजेट नामंजूर केलेले होते.

प्रभारी आयुक्त यांनी खुलासा केला की, शासनाचे मंजुरीनुसार कलम १०४ नुसार कार्यवाही पूर्ण केली आहे.

१९) मा.श्री.आसाराम कावरे - मागील वर्षी जकात नसताना आम्हाला १० लाख रुपये दिले. प्रत्येक नगरसेवकाला ३ लाख निधी देता. ३ लाखात काहीच होणार नाही. आमच्या वॉर्डात यादयाप्रमाणे कामे होत नाहीत. आमच्या वॉर्डातील निधी दुसरीकडे खर्च केला.

२०) मा.श्री.सुनिल त्रिपाठी - वॉर्ड नं.५ मधील ड्रेनेज लाईनला पैसे मिळत नाही. श्री.दीप चव्हाण यांनी वाचलेल्या कामातील केलेले काम कोठे गेले.

२१) मा.श्री.अशोक कानडे - एखादे काम दोन घरासमोरासमोर असतील तर त्याला एवढा मोठा खर्च आला असेल तर त्याचीही चौकशी व्हावी. त्यावर श्री.सोनटक्के इंजि. यांनी खुलासा केला की, त्यात इतरही बाबींचा समावेश आहे.

यावर मा.महापौर यांनी सांगितले की, आपल्या सुचनांची दखल घेउ.

२२) मा.श्री.उडाणशिवे - अण्णाभाउ साठे यांच्या प्रतिमेबाबत मा.आयुक्त, नाशिक विभाग यांचेकडून आलेल्या पत्राबाबत विचारणा केली. यावर मा.महापौर यांनी सांगितले की, हा सभेचा विषय होउ शकत नाही.

नंतर मा.श्री.कावरे यांनी वाडीयापार्क येथे म.गांधी आणि लोकमान्य टिळक यांचे पुतळे पुर्ववत बसविणेबाबत मागणी केली. यावर मा.महापौर यांनी याबाबत क्रिडा संकुल समितीला पत्र दिल्याचे सांगितले. त्यावर याबाबत क्रिडा संकुल समितीकडे पाठपुरावा केला जाईल, असे प्रभारी आयुक्त यांनी सांगितले.

--*--

ठराव : कै.बा.दे.दवाखान्यामध्ये लिप्ट बसवावी या धोरणा ऐवजी इतिवृत्तामध्ये दुरूस्ती सुचवून कै.बा.दे.दवाखाना येथील रूग्णासाठी आवश्यक असणां-या सुविधा प्राप्त होईपर्यंत लिप्ट बसविणे बाबत विचार करू नये. मात्र सोलर बंब बसवावा.तसेच सावेडी भागामध्ये भुयारी गटार योजना बाबत तरतुद करावी. या दुरूस्तीसह खास सभेचे इतिवृत्त कायम करण्यांत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर.

सुचक : मा.श्री.अनंत जोशी.

अनुमोदक : मा.सौ.योगिता सत्रे.

सही /-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ३ दि.३१-१-२००६.

............................................................................

प्रस्तावाचा विषय - मा.राज्य शासनाचे सेवेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणां-या कर्मचा-यांसाठी नविन अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु करणें बाबतचा दिनांक ३१ ऑक्टोंबर २००५ चा शासन निर्णय व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

--*--

प्रस्तावाचा मजकुर : उपरोक्त विषयांकित संदर्भास अनुसरून सादर करण्यांत येते की, राज्य शासनाच्या सेवेत नव्याने नियुक्त होणां-या कर्मचा-यांना नविन अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु करण्यांबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार शासनाने उपरोक्त संदर्भाच्या शासन निर्णयाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

१. शासन सेवेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणां-या कर्मचा-यांसाठी सध्या अस्तित्वात असलेल्या निवृत्ती वेतन योजने ऐवजी केंद्र शासनाच्या धर्तीवर नविन " परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना " खाली नमुद केल्यानुसार लागु करण्यांत येईल.

अ) या योजनेस " परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना " असे संबोधण्यांत येईल.

ब) ही योजना दि.१ नोव्हेंबर ०५ पासुन अंमलात येईल.

क) ही योजना १ नोव्हेंबर ०५ रोजी किंवा त्यानंतर राज्य शासनाच्या सेवेत नियुक्त होणां-या सर्व कर्मचा-यांसाठी अनिवार्य असेल.

ड) या योजने मध्ये दोन स्तर असतील ते म्हणजे स्तर - १ व स्तर - २.

स्तर -१ हा शासनाच्या सेवेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणां-या सर्व कर्मचा-यांसाठी अनिवार्य असेल.

स्तर - २ : त्यांच्यासाठी वैकल्पिक स्वरूपाचा असेल व तो त्यांच्या स्वेच्छा निर्णयांच्या अधिन असेल.

इ - स्तर - १ अंतर्गत प्रत्येक शासकीय कर्मचा-यांस त्यांच्या " मुळ वेतन अधिक महागाई वेतन (असल्यास) अधिक महागाई भत्ता " या रक्कमेच्या १० % इतके मासिक अंशदान द्यावे लागेल. ही रक्कम प्रत्येक महिन्यात कर्मचा-यांच्या वेतन देयकातुन वजा करून घेतली जाईल. राज्य शासन समतुल्य अंशदान देईल. ही अंशदाने आणि गुंतवणुकी वरील प्राप्तीच्या रक्कमा आहरीत करता न येण्या जोग्या " निवृत्ती वेतन स्तर - १ खात्यामध्ये जमा केल्या जातील.

फ - स्तर - २ अंतर्गत प्रत्येक शासकीय कर्मचारी त्याची तशी इच्छा असल्यास वर उल्लेखिलेल्या निवृत्ती वेतन स्तर - १ खात्या व्यतिरिक्त स्वैच्छिक स्तर - २ आहरण योग्य खाते उघडु शकतो. या स्वतंत्र्य खात्यात कर्मचा-यांचे अंशदान जमा केले जाईल आणि शासकीय कर्मचा-यांस त्यातील रक्कमा काढुन घेण्यांचा विकल्प उपलब्ध असेल. तथापि शासन या खात्यात कोणतेही अंशदान जमा करणांर नाही.

ग - शासकीय कर्मचा-यांस नियत वयोमान (५८ वर्षे / ६० वर्षे ) पुर्ण होताच किंवा त्यानंतर नविन निवृत्ती वेतन योजनेच्या स्तर - १ मधुन बाहेर पडता येईल. परंतु या योजनेतुन बाहेर पडतांना सदर कर्मचा-यांस त्याच्या खाती जमा झालेल्या एकुण रक्कमेच्या ४० % रक्कम (निवृत्ती वेतन निधी विनियामक व विकास प्राधिकरणांकडुन नियंत्रित केल्या जाणां-या जिवन विमा कंपनीकडुन ) वार्षिकी खरेदी करण्यांसाठी गुंतविणे अनिवार्य असेल.

उपरोक्त वार्षिकी मधुन संबंधित कर्मचारी तसेच सेवानिवृत्ती वेळी त्यांच्यावर अवलंबून असलेले त्याचे आई वडिल आणि त्याची तिचा ,यथास्थिती पत्नी / पती यांना हयातभर निवृत्ती वेतन देण्यांची व्यवस्था केली जाईल.

संबंधित कर्मचा-यांच्या खाती जमा असलेली उर्वरित रक्कम ठोक स्वरूपात संबंधित कर्मचा-यांस प्रदान केली जाईल व तिचा विनियोग कोणत्याही प्रकारे करण्यांचे स्वातंत्र्य त्यास असेल.

त्याचबरोबर संबंधित कर्मचा-यांस नियत वयोमानापुर्वी (५८ वर्षे / ६० वर्षे पुर्ण होण्यापुर्वी ) निवृत्ती वेतन योजना सोडुन देण्यांची मुभा असेल. तथापि अशा प्रकारे खरेदी करावयाची अनिवार्य वार्षिकी संबंधित कर्मचा-यांच्या निवृत्ती वेतन स्तर - १ खाती जमा झालेल्या एकुण रक्कमेच्या ८० % इतकी असेल.

वरील शासन निर्णयानुसार जे कर्मचारी १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त केले जाणांर आहेत. अशा उमेदवारांना खालील प्रमाणे लेखी कळविणे उचित वाटते.

" १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर त्यांची सेवेत निवृत्ती होताच त्यांना नविन " परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना " लागु ठरेल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतनाचे अंश राशीकरण) नियम १९८४ ) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्व साधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागु होणांर नाहीत. "

दिनांक १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्ती दिलेल्या कर्मचा-यांकडुन अंशदानाची वसुली करणे शासनाच्या अंशदानाचे प्रदान करणे इत्यादी बाबत अंमलात आणण्याची कार्यपध्दती बाबत सविस्तर सुचना उपरोक्त शासन निर्णयामध्ये देण्यांत आलेल्या नसल्याने याबाबतच्या सविस्तर सुचना लवकरच निर्गमित करण्यांत येणांर असले बाबत कळविण्यांत आले आहे.

तरी सदरचा दि.३१-१०-२००५ रोजीचा शासन निर्णय मा.महासभेपुढे माहितीसाठी सादर करणेंस मंजुरीस्तव.

यावर मा.उपायुक्त (सा.)यांचा अभिप्राय की, अहवालानुसार महासभेपुढे सादर करणेसाठी शिफारस आहे.

यावर मा.आयुक्त सो.यांचा अभिप्राय की, सहमत.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.सर्वसाधाण सभेपुढे माहितीस्तव ठेविला.

--*--

**चर्चा -**

१ ) मा.श्री.अभय जगन्नाथ आगरकर - केंद्र शासनाच्या या जी.आर मुळे सध्या देण्यात येणा-या पेन्शनवर काय परिणाम होणार आहे याची आकडेवारी प्रशासनाने काढली आहे काय ?

२ ) मा.श्री.दिप नारायण चव्हाण - सदरचा जी.आर केंद्र शासनाने पाठविला आहे तो राज्यास लागू आहे काय ? १०% अंशदान निवृत्ती वेतन योजना काय आहे ते सांगावे.

३ ) मा.उपायुक्त (सा) - मा.राज्य शासनाचे सेवेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणां-या कर्मचा-यांसाठी त्यांच्या " मुळ वेतन अधिक महागाई वेतन (असल्यास) अधिक महागाई भत्ता " या रक्कमेच्या १० % इतके मासिक अंशदान कपात करणेत येवून तेवढीच रक्कम आपणास भरावी लागेल व सदर कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर या योजनेखाली त्यास पेन्शन अदा करणेत येईल. यात विशेष असे महानगरपालिकेचे नुकसान होत नाही.असा जी.आर महासभेत माहितीस्तव ठेवणेत आलेला आहे.

--*--

ठराव - ऑफीस रिपोर्ट मंजूर.नोंद घेण्यात येत आहे. नियमानुसार कार्यवाही करावी.

खर्च मंजूर. ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक - मा.श्री.अभय जगन्नाथ आगरकर

अनुमोदक - मा.श्री.शेळके सुरेश छबुराव

सही /-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ४ दि.३१-१-२००६.

••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••

प्रस्तावाचा विषय - मुकूंदनगर ,फकिरवाडा पाणीपुरवठा योजनांतर्गत ८ इंची पाईप लाईन व १० लाख लिटर्स क्षमतेची उंच पाण्याची टाकी बांधणें बाबत ऑफिस रिपोर्ट.

--*--

प्रस्तावाचा मजकुर : मुकूंदनगर ,फकिरवाडा प्रभागासाठी पाणीपुरवठा योजना राबविणे कामी रक्कम रूपये १,७३,०३,८६१ /- निव्वळ खर्चाची पाणीपुरवठा योजना तयार करून मा.शासनास सादर करण्यांत आलेली होती. त्यानुसार मा.शासनाने शासन निर्णय क्रमांक पापुयो / १९०४ / स.क्र.३३२ / प्र.क्र.७२ / पा.पु.१७ ,मंत्रालय,मुंबई दिनांक १८-८-०४ अन्वये रूपये २,०३,३२,०३६ /- ढोबळ किंमतीच्या पाणीपुरवठा योजनेच्या अंदाजपत्रकास व नकाशांना काही अटींच्या अधिन राहुन प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. तसेच या याजनेसाठी शासनाने " अवर्षणप्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम " पॅकेज अंतर्गत रूपये २५.०० लाख अनुदान मंजुर केलेले आहे.

वरील शासन निर्णयातील अटीत योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांने राबवावी अशा प्रकारचा ठराव मनपाने पारित करून तो मजिप्रा मंडळास सादर करावा इत्यादी बाबी नमुद केलेल्या असल्यामुळे जर सदर प्रकारचा ठराव महानगरपालिकेने पारित केल्यास महानगरपालिकेला सदर योजनेच्या अंदाजपत्रकीय रक्कमेवर १७.५ % एवढी रक्कम म्हणजेच रूपये ३०,२८,२७५ /- इ.टी.पी.चार्जेस म्हणुन महाराष्ट्र जिवन प्राधिकरण मंडळास भरावे लागतील. त्यामुळे योजना महानगरपालिके मार्फत राबविल्यास वरील ए.टी.पी.चार्जेसचे खर्चात काटकसर होवुन महानगरपालिकेची आर्थिक बचत होईल तसेच महानगरपालिकेकडे तांत्रिक कुशलता उपलब्ध असल्यांने त्यादृष्टीनेच प्रस्तावित काम महानगरपालिके मार्फतच करणेविषयी सदरचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यांत आला. सदरच्या प्रस्तावावर दि.३१-३-०५ चे सर्वसाधारण सभेत सांगोपांग चर्चा होवुन खालील प्रमाणे ठराव क्र.४ दि.३१-३-०५ अन्वये सर्वानुमते पारित झाला.

ठराव : मुकूंदनगर ते फकीरवाडा पाणीपुरवठा योजना पाईप लाईर्न टाकणे व उंच टाकी बांधणे या प्रस्तावास पुढील बाबींच्या समावेशासह मान्यता देत आहे.

१. अंदाजपत्रकानुसार व प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे १० % लोकवर्गणी भरणेंस ही सभा मान्यता देत आहे. महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीचा विचार करता मा.शासनाने उर्वरित संपुर्ण रक्कम सदरच्या पाणी पुरवठा योजनेकरीता उपलब्ध करून देणेस्तव मा.शासनांस विनंती करणेत यावी.

२. मा.शासन यंत्रणेकडुन सदरचे काम केल्यास सुपरव्हिजन चार्जेस व तदनुषंगिक बाबींचा १७.५ % वाढीव खर्च अपेक्षित आहे. या करीता महानगरपालिकेच्या माध्यमातुन सदरचे काम करणेंत यावे.खर्च मंजुर.

वरील प्रमाणे पारित झालेल्या ठरावानुसार सविस्तर प्रस्ताव तयार करून ठरावासह पत्र क्र.पा.पु./ ५० दि.२५-४-२००५ अन्वये मा.शासनांस सादर करणेंत आला.

सदरचा प्रस्ताव मा.शासनास सादर केला असता मा.शासनाकडील पत्र क्र.पापुयो / १९०५ / स.क्र.३३२ / प्र.क्र.७२ / पा.पु.१७ पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय मुंबई दि.७-५-२००५ चे पत्रान्वये इकडेस कळविले आहे की, मा.शासनाचे प्रचलित धोरणानुसार गावाची योजना स्थानिक स्वराज्य संस्था स्वत : राबविणांर असेल तर त्यांना देय असलेल्या अनुदानातुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांस देय असलेले १७.५ % इ.टी.पी.चार्जेस वजा करून उर्वरित अनुदान महानगरपालिका / नगरपालिकेस देय राहते. या धोरणानुसार अहमदनगर महानगरपालिका वर उल्लेख केलेली योजना राबविण्यांस तयार असेल तर शासनास तसे कळविण्यांत यावे. त्यानंतर योजनेची मुळ प्रशासकीय मान्यता रद्य करून नविन

किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यांची कार्यवाही करण्यांत येईल. तसेच कोणत्याही परिस्थितीत अहमदनगर महानगरपालिकेच्या योजनेसाठी महानगरपालिकेने पत्रात नमुद केल्याप्रमाणे १० % लोकवर्गणीची रक्कम वजा जाता उर्वरित सर्व ९० % रक्कम अनुदान स्वरूपात उपलब्ध करून देता येणांर नाही. अहमदनगर महानगरपालिकेस योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यान्वीत करणार असेल तर योजनेच्या ढोबळ खर्चाच्या फक्त २३.३३ % रक्कम अनुदान स्वरूपात मिळु शकेल. उर्वरित सर्व रक्कम लोकवर्गणी (१० % ) व कर्ज (६६.६७ %) स्वरूपात महानगरपालिकेसच उपलब्ध करून द्यावी लागेल. इत्यादी बाबी पत्रात नमुद करून इकडेस कळविलेले आहे.

तरी मुकूंदनगर फकिरवाडा प्रभागासाठीची पाणी पुरवठा योजने विषयी नुकतेच मा.शासनाकडुन संदर्भिय प्राप्त झालेल्या पत्रानुसार पुढील निर्णय होणेकामी आदेशार्थ ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त (सा ) यांचा अभिप्राय की, अहवालानुसार महासभेपुढे निर्णयास्तव सादर करणे योग्य.

--*--

चर्चा :

१) मा.श्री.भानुदास कोतकर - सदर पाणीपुरवठा योजनेमध्ये ८ इंची ऐवजी १२ इंची पाईपलाईन धरणेत यावी. केडगांव भागामध्ये उंच टाकी आहे. त्यानंतर पाणीपुरवठयाचा प्रश्न सुटू शकेल. इतर कामे बंद आहेत त्याबाबत म्यु.इंजिनिअर यांनी खुलासा करावा असे सुचविले.

२) मा.श्री.अभय आगरकर - आगरकर मळा येथील टाकीचे काम पूर्ण झालेले आहे. मोहीनीनगर भागातील टाकीचे काम बंद आहे. ठेकेदाराला पैसे न दिल्यामुळे काम बंद आहे.

३) मा.श्री.भानुदास कोतकर - टोटल पैसे न दिल्यामुळे कामे बंद आहेत. यावर प्रभारी आयुक्त यांनी खुलासा केला की, ठेकेदारास आतापर्यंत २५ ते ३० लाख रुपयाचे पेमेंट करणेत आले आहे. यापुढे नियमाप्रमाणे पैसे देण्यात येतील.

मा.महापौर - सदर भागातील टँकरचा खर्च कमी झाला पाहिजे.

मा.श्री.कोतकर - सदरच्या कामाबाबत ठेकेदार यांना मिटींग घेउुन सुचना दयाव्यात. केडगांव विभागामध्ये ३ महिन्यापासून पाणीपुरवठा टँकरची आवश्यकता नसतानाही टँकरने पाणी पुरविले जात आहे. यावर प्रभारी आयुक्त यांनी सिटी इंजिनिअर श्री.एन.डी.कुलकर्णी यांना सदरची बाब तपासून घ्यावी व त्वरीत कारवाई करावी असे निर्देश दिले.

मा.श्री.कोतकर - पाणीपुरवठयाच्या योजनेतील संपवेल टाकीचे काम परत सुरु होउ शकेल. ठेकेदारास परत बोलावून काम सुरु करणेबाबत सुचवावे.

४) मा.सौ.साहनी - मुकुंदनगरमध्ये ४-४ दिवस पाणी येत नाही. निधी आणून काम पूर्ण करण्याची जबाबदारी महापालिकेची आहे.

५) मा.सौ.दिघे - २५ लाख रुपयेचा निधी येउन पडला आहे. परंतु काम न केल्याने निधी परत गेला.

६) मा.श्री.कृ.द.जाधव - फकिरवाडा, मुकुंदनगर पाणीपुरवठयाचा प्रश्न हा महापालिका हद्दीत येण्यापूर्वीचा आहे. याबाबत ठराव झाला असतानाही कामे झालेली नाहीत. पाणीप्रश्न खरोखर सोडवायचा असेल तर काय ठराव करणार. प्रश्न मार्गी लावायचा असेल तरच मिटींगमध्ये मार्गदर्शन करा. याबाबत फेरप्रस्ताव सादर करु नका. अंतिम मंजुरी दया असे सुचविले.

यावर प्रभारी आयुक्त यांनी खुलासा केला की, मागील वर्षी अवर्षण प्रवण विकास मधून शासनाकडून निधी मंजूर करुन आणलेला होता. २५ लाख रु.चा निधी उपलब्ध होत होता. परंतु नंतरच्या शासन निर्णयाने सदरचा निधी रदद केलेला आहे. महानगरपालिकेने स्वतःचा निधी टाकून काम करावे असे सुचविलेले आहे. त्यानुसार आकृतीबंध मंजूर केल्यानंतर प्रश्न येणार नाही. १५ दिवसात योजना तयार होउ शकते. व ३१ मार्चपुर्वी योजना सुरु करता येईल.

७) मा.श्री.कोतकर - ठराव मंजूर करुन शासनाकडे पाठवावा. शासनाकडून अनुदान उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी आमची राहील.

८) मा.श्री.कृ.द.जाधव - ही योजना जीवन प्राधिकरणामार्फत राबवायची नाही. तेव्हा त्यास शासन अनुदान देणार आहे काय? यावर प्रभारी आयुक्त यांनी खुलासा केला की, ही योजना महापालिकेमार्फत राबवावयाची आहे.

९) मा.श्री.त्रिपाठी - सारसनगर पाणी प्रश्न हा मुकुंदनगर पाईपलाईनवरच अवलंबुन आहे. सदर भागामध्ये टाकी करण्याची आवश्यकता होती. परंतु आतापर्यंत कारवाई झालेली नाही. नगरसेवकांना विश्वासात घेउन सारसनगरमध्ये टाकी करावी. याबाबत मा.महापौर यांनी खुलासा केला की, नागरिकांचे मागणीवरुनच कामे होतात.

--*--

ठराव : मुकूंदनगर , फकिरवाडा,पाणीपुरवठा योजना प्रकल्पास मान्यता देण्यांत येत असुन सदरचे काम महानगरपालिके मार्फत करण्यांत यावे. परंतु याबाबत मा.शासनस्तरावर महानगरपालिकेस २३.३३ % एवढे अनुदान प्राप्त होणेसाठी मा.शासनाकडे योग्य तो पाठपुरावा करावा. ठराव बहुमताने मंजुर.
सुचक : मा.सौ.सुनिता राकेश साहनी.
अनुमोदक : मा.श्री.सुनिल चंद्रभुषण त्रिपाठी.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ५ दि.३१-१-२००६.

................................................................................

प्रस्तावाचा विषय : अहमदनगर शहरात रस्ते विकास महामंडळा मार्फत एकात्मिक रस्ते विकास योजना राबविणें बाबत ऑफिस रिपोर्ट.

--*--

प्रस्तावाचा मजकुर : अहमदनगर शहरामध्ये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळा मार्फत प्रकल्प राबविण्या पुर्वी महानगरपालिका आर्थिक दृष्ट्या वर्धनक्षम आहे. किंवा कसे ? त्या साठी Feasibiity study करणे व सुसाध्यता अहवाल तयार करणेसाठी सल्लागाराची नेमणुक करावी लागणार आहे. तसेच सल्लागार व इतर अनुशंगिक बाबीवर होणाऱ्या खर्चाच्या ५०% खर्च महानगरपालिकेने उचलण्यासाठी तसेच एकात्मिक रस्ते विकास योजना राबविणेकामी एकूण -२४ मुद्यांची माहिती तयार करण्यात आली होती. म.रा.र.वि.म. मुंबई यांना मा. महासभेचा ठराव पाठविणे आवश्यक होते.

त्याप्रमाणे सदरचा विषय मा. सभेपुढे ठेवण्यात आले .प्रस्ताव क्र.२ दिनांक-१६-७-२००५ अन्वये वरील २४ मुद्यांना मंजुरी देण्यात आली. मंजुरीचा प्रस्ताव मा.कार्यकारी अभियंता महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ यांचेकडेस पाठविण्यात आले.

सदर कामासाठी मा.रमानाथजी झा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक एम.एस.आर.डी.सी. मुंबई ,यांचे दालनांत दिनांक -२२-९-२००५ रोजी मा.महापौर,मा. आयुक्त ,म.न.पा. पदाधिकारी व अधिकारी यांचे समवेत बैठक झाली. तसेच मा.आयुक्त साहेब यांचे दालना मध्ये दिनांक -७-१०-२००५ रोजी मा. महापौर, मा.आयुक्त व श्री.एच.आर. पवार ,अधिक्षक अभियंता ,म.रा.र.वि. महामंडळ ,पुणे व महानगरपालिकेचे अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते त्या बाबत शहर रस्ते विकास योजना मार्गी लावणे बाबत सविस्तर चर्चा झाली. चर्चेमध्ये ठरल्या प्रमाणे खालिल चार रस्त्यांची आधुनिक पध्दतीने कॉक्रिंटीकरण व सुशोभिकरण करण्याचे ठरविण्यात आले.

१) सक्कर चौकातील हॉटेल यश पॅलेस ते कोठी ( कोठी रोड )
२) बालिकाश्रम कोपरा ते भुतकर वाडी ते सावेडी गावठाण ते मनमाड रस्त्यापर्यत ( बालिकाश्रम रोड )
३) अमरधाम कोपरा ( नेप्ती नाका चौक ) ते दिल्लीगेट ते लालटाकी ,अप्पुचौक
४) कुष्ठधाम चौक ते पारिजात कॉर्नर ते औरंगाबाद रोड पर्यंत ( गुलमोहर रोड )

या चारही रस्त्यांचे विकास आराखड्या मधिल रस्ता रूंदीप्रमाणे रस्त्याचे कॉक्रिंटी करण ,रस्ता दुभाजक ,रस्त्याच्या कडेला दोन्ही बाजुने गटर बांधणे ,अशा पध्दतीने रस्त्याचे काम एम.एस.आ.डी.सी. मार्फत करावयाचे ठरले आहे.व रस्त्याच्या दोन्ही बाजुला आवश्यकते प्रमाणे पाणी व ड्रेनेज लाईन टाकणे ही कामे म.न.पा. मार्फत करावयाचे ठरले आहे. चारही रस्त्याची सद्यस्थितीतील एकूण रूंदी ,विकास आराख-ड्या मधील लांबी वरूंदी नकाशासह मा. अधिक्षक अभियंता ,महाराष्ट्र राज्य रस्ते विकास, महामंडळ यांना कळविण्यात आले आहे.प्रस्तावीत विषयासाठी म.रा.र.वि. महामंडळ,यांना खालिल बाबींसाठी म.न.पा.महासभेची मंजुरीची आवश्यकता आहे.

१) अहमदनगर महानगरपालिके कडुन महाराष्ट्र राज्य विकास महामंडळ (मर्या.)मुंबई यांना पुढील चार रस्ते रूंदीकरणासाठी तसेच मजबुतीकरणासाठी हस्तांतरीत करण्यात येत आहेत.

अ) सक्कर चौकातील हॉटेल यश पॅलेस ते कोठी (कोठी रोड) -२.५० कि.मी.

ब) बालिकाश्रम कोपरा ते भुतकरवाडी ते सावेडी गांवठाण मनमाड रस्त्यापर्यंत (बालिकाश्रम रोड) -३०० कि.मी.

क) अमरधाम कोपरा (नेप्ती नाका चौक ) ते दिल्लीगेट ते लालटाकी अप्पु चौक १.५० कि.मी.

ड) कुष्ठधाम चौक ते पारिजात कॉर्नर ते औरंगाबाद रोड पर्यंत ( गुलमोहर रोड ) - १.८५ कि.मी.

२) सदर रस्त्यांच्या विकास योजना रूंदीमध्ये असणारी झाडे,सर्व सेवावाहिन्या (विद्युत टेलीफोन , पाणी पुरवठा ,मलनिस्सारण इ.) व अतिक्रमणे हटविण्याचे काम अहमद नगर म.न.पा.मार्फत अहमदनगर म.न.पा.च्या खर्चाने प्रत्यक्ष बांधकाम करण्यापुर्वी करण्यात येईल.

३) कामांना लागणारा खर्च अहमदनगर म.न.पा.मार्फत रस्ते विकास महामंडळास त्यांच्या मागणी नुसार टप्याटप्याने काम सुरू होण्यापुर्वी तसेच काम चालु असतांना करण्यात येईल.

४) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ अहमदनगर म.न.पा. कडुन कामात लागणारे सहकार्य पूर्णपणे करण्यात येईल.

५) कामात वापरात येणाऱ्या Ready Mix Coancrete (RMC) वर अहमदनगर म.न.पा.कडून कोणताही कर आकारण्यात येणार नाही.

६) कामासाठी कामाच्या ठिकाणी कास्टिंगयार्ड साठी जागेची आवश्यकता भासल्यास व ती अहमदनगर म.न.पा.कडे उपलब्ध असल्यास अहमदनगर म.न.पा.कडून नियमाप्रमाणे भाडे आकारून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास हस्तांतरीत करण्यात येईल. काम झालेनंतर सदर जागा सुस्थितीत अहमदनगर म.न.पा.कडे हस्तांतरीत करण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची असेल.

७) रस्त्यांची कामे संपल्यानंतर ते रस्ते महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने अहमदनगर म.न.पा.कडे हस्तांतरीत करावयाचे आहेत. रस्ते हस्तांतरीत झाले नंतर त्यांची दैनंदिन देखभाल अहमदनगर म.न.पा.मार्फत स्वखर्चाने करण्यात येईल. परंतु कामात काही मोठा दोष आढळल्यास तो दुरूस्त करण्याची जबाबदारी डिफेक्ट लायबिलीटी पिरियडपर्यंत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची असेल.

तरी वरील प्रस्ताव हे मा.सर्व साधारण सभेचा ठराव मंजूर करून त्याची एक प्रत महाराष्ट्र राज्य विकास महामंडळ , या कार्यालयाकडे पाठवावी लागणार आहे. सदरील रिपोर्ट आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त सामान्य यांचा अभिप्राय की,.अहवालानुसार प्रस्ताव मा.सर्व साधारण सभेपुढे ठेवणेसाठी शिफारस आहे.मात्र अटी स्विकारतांना अट क्रमांक ७ बाबत डिफेक्ट लायबिलीटी पिरियड मधील जबाबदारी म.रा.वि.मं.कडे सोपविणे उचित राहील.आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, उपरोक्त प्रस्तावाचे अवलोकन केले.अहमदनगर या ऐतिहासिक शहरामध्ये आधुनिक सिमेंट काँक्रिटचे रस्ते विकास करणे आवश्यक आहे. शहरातील राज्य मार्ग रस्ते आणि राष्ट्रीय महामार्गाचे रस्त्यांचे आधुनिकीकरण आणि विकास बी.ओ.टी.तत्वावर सार्वजनिक बांधकाम विभाग,महाराष्ट्र शासनाकडुन होणांर आहे. या रस्त्यांना लिंक रोड आणि शहरातील प्रस्तावित चार (४) रस्त्याचे विकासाठी उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणेस हरकत नाही. या रस्त्याचे विकासासाठी अंदाजे रू.१५ /- कोटी इतका निधी वित्तिय संस्थांकडुन कर्जाचे स्वरूपात उभा करावा लागेल. तसेच सेवा सुविधा योग्य ठिकाणी स्थलांतरित करणेसाठी मनपा निधीतुन खर्च करावा लागेल.

**चर्चा -**

१) मा.श्री.दीप चव्हाण - सुरुवातीस सभागृहामध्ये सदस्य संख्या कमी झाली असल्यामुळे कोरम आहे किंवा नाही याबाबत शंका उत्पन्न केली. सदस्य संख्या १९ आहे असे त्यांनी सांगितले. कायदयाने कामकाज चालले पाहिजे असे सुचविले असता सदस्य संख्या कमी दिसल्यामुळे मा.महापौर यांनी ठिक ४.२५ वाजता ५ मिनीटे सभा तहकूब केली. त्यानंतर परत ४.३० वाजता सभा सुरु झाली.

२) मा.श्री.कृ.द.जाधव - ४ रस्त्यांची कामे मा.श्री.देवरा, आयुक्त तथा प्रशासक असताना हाती घेतली होती. सिध्दीबाग ते अप्पु हत्ती या रस्त्यासाठी काढलेली रुंदी, ३-४ फुटासाठी शॉपींग सेंटर उध्वस्त करु नये, सिध्दीबाग गार्डनकडील भागात रुंदी वाढवावी त्यामुळे बाजारपेठही वाचेल. कारण शॉपींग सेंटरमधेही गाळे मागे जागा नसल्यामुळे सरकू शकत नाही. याचा विचार करावा. आयुर्वेद मागील रस्त्याचे काम ठेकेदाराकडून करुन घ्यावे.

३) मा.श्री.कैलास गिरवले - पूर्वी ४ रस्त्याचा विषय घेतलेला होता. परत अशा प्रकारे विषय घेउन वादग्रस्त ठरु पहात आहे. स्थायी समितीमधे सक्कर चौक ते आयुर्वेद कोपरा चौक या रस्त्यावर ८ लाख ८ हजाराच्या जादा कामास मंजुरी दिलेली आहे. या कामाची गरज नव्हती. या रस्त्याचे काम मागेच झाले असताना आता १ वर्षाने स्थायी समितीपुढे का पाठविले? बोगस एस्टीमेट त्यास मंजुरी देउ नये. यावर प्रभारी आयुक्त यांनी सांगितले की, कामाची चौकशी केली जाईल व काम झाले नसेल व कामाचा चुकीचा रिपोर्ट दिलेला असेल त्याबाबत कारवाई केली जाईल. याबाबतचा ऑफिस रिपोर्ट काय आहे, तो वाचून दाखवावा. यावर मा.महापौर यांनी सांगितले की, काम करण्याची गरज का भासली याचा खुलासा करावा. यावर इंजिनिअर यांनी खुलासा केला की, काम करुन घेण्यात आले आहे. काम करावयाचे नाही. मुळ अंदाजपत्रकात तरतुद केली नव्हती. गटाराची तरतूद केली नव्हती.

काम झालेले नाही असे सांगितले मात्र ते काम तपासून घेउ असे प्रभारी आयुक्त यांनी सांगितले.

४) मा.श्री. दिपक सुळ - पूर्ण चौकशी झाल्याशिवाय मंजुरी देउ नये.

५) मा.श्री.दीप चव्हाण - दि.१९ तारखेला विषय झालेला आहे. अंदाजपत्रकातील बचतीमधून ८ लाखास मंजुरी मागितली. तरतूदच नसताना बचत राहील कशी? खडीकरणाचे बील ७३ लाख अंदाजे केलेले आहे. स्थायी समितीमध्ये आम्ही विरोध केलेला आहे. सदर काम हे ७९ लाखाचे झालेले आहे काय?

सौ.अनिता आगरकर नगराध्यक्षा असताना ८० लाखाचे डांबरीकरणाचे एस्टीमेट मंजूर करण्यात आले होते. एकाच कामामध्ये सन २००२ पासून किती पैसे खर्च करावयाचे ठरलेले आहे किंवा कसे? याचा खुलासा करणे आवश्यक आहे. बोगस काम झालेले आहे. संबंधीतावर योग्य ती कार्यवाही करावी.

६) मा.श्री.त्रिपाठी - या विषयास आम्ही स्थायी समितीत विरोध नोंदविलेला आहे.

७) मा.श्री.दिपक सुळ - याबाबत कामाची चौकशी करावी. जास्त काम झालेले असले तरी बील देण्याची जरुरी नाही.

८) मा.श्री.कैलास गिरवले - रस्ते विकासाचे १५-१६ कोट रुपयाचे काम करीत आहोत. हे काम करीत असताना इतर कामे असतील त्यासोबत इतर अनुषंगिक कामे करणे जरुरीचे आहे. जेथे ड्रेनेज लाईन नाही तेथे करावी लागेल. कर्ज घेउन कामे करणार आहोत. १०% सुपरव्हिजन मागीतलेले आहे. कर्ज घेउनच काम करावयाचे असेल तर सावेडी भुयारी गटार योजनेसाठीही कर्ज घेउन मार्गी लावावे व नंतरच रस्त्याच्या कामाचा विचार करावा. या कामास प्राधान्य दयावे. तोपर्यंत हा विषय तहकूब ठेवावा.

९ ) मा.श्री.अशोक कानडे - शहर विकास व शहर सुधारणा झाली पाहिजे असे सर्वांनाच वाटते. जे चार रस्ते निवडण्यात आलेले आहेत ते योग्य वेळी निवडलेले नाहीत असे वाटते. मागील अडीच वर्षाच्या कालखंडामध्ये एकही भरीव काम करु शकलो नाही. उपनगरात ड्रेनेज नाही, रस्ते नाहीत,

ज्या पध्दतीने शहराचा अभ्यास व्हावयास पाहिजे त्यापध्दतीने अभ्यास झालेला नाही. रस्ते कोणत्या पध्दतीने निवडलेले आहेत ते सुसंगत निवडलेले नाहीत. त्याचे नियोजन नाही. लोकांना याची आवश्यकता आहे काय? रस्त्यावरील मुळ समस्या कायम आहेत. हागणदारी समस्या मुक्त होणे आवश्यक आहे. उपनगरातील ड्रेनेजचा प्रश्न २५ ते ३० वर्षापासून बाजूला ठेवला गेला आहे. मुलभूत समस्यांचा विचार व्हावा. हददवाढीतील पाणी तसेच रस्त्याचा प्रश्न असेल, सामान्य नागरिकांचे प्रश्न सुटत नाही. तरी सदरचा घेतलेला विषय तहकूब ठेवून भुयारी गटारींचा प्रश्न प्राधान्याने घ्यावा.

यावर मा.महापौर यांनी खुलासा केला की, सदर रस्त्याचा विषय यापूर्वी ३ वेळा सर्व साधारण सभेपुढे आलेला आहे.

१०) मा.श्री.अनंत जोशी - काम होणा-या रस्त्यांचा सिक्वेन्स नाही. गुलमोहर कोठे, पाईपलाईन कोठे. येथे प्रामुख्याने ड्रेनेज नसल्याने नागरिक शिव्या देतात. आजच हे रस्ते घेतले पाहिजे असे नाही. पॅचींग होत नाही. हा विषय तहकूब ठेवून भुयारी गटार योजना हाती घ्यावी. रस्ते विकास महामंडळामार्फत रस्ते करण्यास आमचा विरोध नाही. पण वेळोवेळी आम्ही केलेल्या सुचनांचा विचार व्हावा. त्याचा अंतर्भाव झ ालेला नाही. पाणी, रस्ते, ड्रेनेज इत्यादीचा विचार व सर्व्हे करावा. बेसिक इन्फ्रास्ट्रक्चर व्हावयास पाहिजे.

गिडॉन कंपनीने काम अर्धवट सोडले असेल तर त्यावर काय कार्यवाही केली? त्याला नोटीस दिली काय? श्री.अडिवरेकर यांचेशी चर्चा करुन ४ कलमी योजना दिली आहे त्यावर विचार केला नाही. वर्ल्ड बँकेकडून काम करुन घ्या. एमएसआरडीसी यांचेकडे सुपरव्हिजन देणेचे कारण नाही. रस्ते करताना अतिक्रमण, ड्रेनेज, पाईपलाईन करणेची जबाबदारी ही महापालिकेची आहे.

११) मा.श्री.सुनिल त्रिपाठी - आर्थिकदृष्टया सक्षम झाल्यानंतर विचार करावा.

१२) मा.श्री.दीप चव्हाण - १६-६-०५ च्या मंजुरीचा ठरावा वाचावा. (ठरावाचे वाचन करण्यात आले.) सदर मंजुरी दिली असताना हा विषय परत का आला गेला? अमरधाम कोपरा पासूनच्या रस्त्याचे बी १ टेंडर दिलेले आहे. वर्कऑर्डर दिलेली आहे. हा रस्ता घेता येत नाही. रस्त्याची घनता पात्रता काय आहे? कोणी प्लॅन काढलेले आहे, दिलेले प्लॅन एस्टीमेट अभ्यासपूर्ण नाही. एमएसआरडी मंडळ आपल्याकडून सर्व कामे करुन घेणार आहे. मग ते काय करणार. या कामावर प्रशासनाने पैशाची उधळपटटी करु नये. सिटी इंजिनिअर सारखे आणखी ४ अधिकारी घ्यावे व आपणामार्फत काम करावे. आपल्याकडे असलेल्या अधिका-यांचे काय काम आहे? त्यांना कामे करु दया. दिड कोटीचे टक्केवारी चार्जेस देणेपेक्षा ४ पीडब्ल्यूडी इंजिनिअर वर्षभरात काम करु शकतील. श्री.देवरा साहेब प्रशासनाधिकारी असताना ४ रस्ते अपुरे ठेवलेले आहेत त्याचे काय? एमएसआरडी कडून डिझाईन घ्यावे. यापूर्वी एमएसईबीकडे पोल हटविणेसाठी पैसे भरलेले असून पोल हटविले गेले नाहीत. कामाबाबत एमएसआरडी कडून तांत्रिक सहाय्य घ्यावे. यापूर्वी एकदा ठराव करुन दिलेला आहे. त्यावरच कार्यवाही करावी. सदरचा विषय तहकूब करावा. पूर्वीच्या रस्त्याचे कामाबाबत टर्मिनेशन नोटीस देणे आवश्यक आहे. अन्यथा यास प्रशासन जबाबदार राहील सभागृह जबाबदार राहणार नाही, असे सुचविले.

मा.महापौर - आपण कर्ज घेउन काम करावे असे श्री.लखीना यांनी सांगितले होते. याबाबत पूर्वी मिटींग झालेली होती व एमएसआरडी ने ठराव मंजूर केलेला होता. नगर शहराचा विकास होउ शकणार नाही.

शेवटी मा.महापौर यांनी विषय रद्द केला आहे, असे सांगितले.

--*--

ठराव : अहमदनगर शहरात रस्ते विकास महामंडळामार्फत रस्ते विकास योजना राबविणे प्रस्तावाबाबत झालेल्या चर्चेनुसार व सभागृहाचा कल पाहता सदरचा प्रस्ताव सद्यस्थितीमध्ये रद्द करण्यांत यावा.
ठराव सर्वानुमते मंजुर.
सुचक : मा.श्री.सुरेश शेळके.
अनुमोदक : मा.श्री.अशोक कानडे.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ६ दि.३१-१-२००६.

••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••

प्रस्तावाचा विषय : नविपेठ शहर सहकारी बँकेजवळील चौकास "सदगुरू शंकर महाराज चौक " असे नामकरण करणें बाबत मा.श्री.अभय आगरकर,नगरसेवक यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

--*--

प्रस्तावाचा मजकुर : नविपेठेतील शहर सहकारी बँकेजवळील चौकास सदगुरु श्री शंकर महाराज चौक असे नामकरण करणेबाबत मा.श्री.अभय जगन्नाथ आगरकर,नगरसेवक यांनी दिनांक २/१/२००६ रोजी यादीद्वारे कळविले आहे.तसेच यादीत डॉ.नागेश धनेश्वर यांच्या नविपेठेतील वाडयामध्ये त्यांच्या मार्गदर्शनाखाली ज्ञानेश्वरीवर खुप लिखाण केले आहे.नगर जिल्हयांतील नाथ पंथीयांच्या साधनेची स्थळे त्यांच्याच कृपा आशिर्वादामुळे उर्जित अवस्थेत झाली आहेत.ज्या वास्तूमध्ये श्री.शंकर महाराज यांचे वास्तव्य होते.त्या डॉ.धनेश्वर वाडयाजवळील चौकास (सध्याचा नविपेठ चौक ) सदगुरु श्री.शंकर महाराज चौक असे नामकरण करण्याचा हेतू सफल व्हावा याबाबत उल्लेख केलेला आहे.

अहमदनगर महानगरपालिकेकडील नोंदवही पाहता सदर चौकास कोणाचेही नांव दिल्याचे आढळून येत नाही. मुंबई प्रातिंक महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसूची ड प्रकरण ११(२) अ नुसार महानगरपालिकेच्या मंजूरीने महानगरपालिकेमध्ये विहीत असलेल्या कोणताही रस्ता किंवा कोणतेही सार्वजनिक ठिकाणी नांव देण्याचा अधिकार मा.आयुक्तांना असलेने सदरचे प्रकरण मा.सर्वसाधारण सभेमध्ये ठेवण्यांविषयी आदेशार्थ सादर.

यावर श्री.एम.डी.मगर ,उप शहर अभियंता यांचा अभिप्राय की, शाखा अभियंता यांचे अहवालाप्रमाणे प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजूरीस व आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर ) यांचा अभिप्राय की, सामान्य प्रशासन विभागाचा अभिप्राय घ्यावा.

यावर नगरसचिव, यांचा अभिप्राय की, सामान्य प्रशासनाने महासभेपुढे पारित (मंजूर) झालेला कोणताही ठराव संबधीत खात्याकडे पाठविल्यानंतर त्या संबंधीत खात्याने त्यांचेकडे येणा-या सर्व ठरावांची नोंदवही ठेवणे गरजेचे आहे.त्यानुसार प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे सा.बां.खात्याकडे सदर ठरावाच्या एकत्रित नोंदवहीत सि.इं. यांनी खात्री केलेले दिसून येते.तरी सदरचा प्रस्ताव मा.सभेपुढे ठेवणेविषयी सादर.

यावर मा.उपायुक्त (कर ) यांचा अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे नविपेठ चौकास (शहर सहाकारी बँकेजवळ) सदगुरु श्री.शंकर महाराज चौक असे नामकरण करण्याबाबतचा प्रस्ताव मा.महासभेपुढे ठेवणे योग्य.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, सहमत

अशाबाबतची मा.श्री.अभय जगन्नाथ आगरकर यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट पुढील निर्णयास्तव मा.सर्व साधारण सभेपुढे ठेविला.

--*--

ठराव - ऑफीस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.नियमानुसार कार्यवाही करावी.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक - मा.श्री.अभय जगन्नाथ आगरकर.

अनुमोदक - मा.श्री.विनीत नाथ पाऊलबुधे. सही /-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

दि.३१-१-०६ रोजीचे सर्वसाधारण सभेपुढील चर्चा

विषय क्र.१ - मागील कार्यवृत्त कायम करणे.

सभेचे कामकाज सुरु झाले असताना मा.महापौर यांना येण्यास वेळ लागणार असल्याने सभेचे अध्यक्ष म्हणून श्री.सुरेश शेळके,सभागृह नेते यांनी काम पहावे अशाबाबत श्री.नरेंद्र कुलकर्णी, सभापती, स्थायी समिती यांनी प्रस्ताव मांडला. त्यास श्री.दिपक सुळ, नगरसेवक यांनी अनुमोदन दिले.

मागील कार्यवृत्त कायम करण्यास घेतले असता खालीलप्रमाणे चर्चा झाली.

१) मा.श्री.कृ.द.जाधव - मागील मिटींगमधील विषय क्र.४ बाबत सुधारित अंदाजपत्रकामध्ये ३/३ लाख निधी केलेला होता. आता हे आर्थिक वर्ष संपण्यास २ महिनेचा कालावधी राहीलेला आहे. तो निधी अजुन मंजुर झालेला नाही. जो ठराव केला आहे त्याची अंमलबजावणी आर्थिक वर्षात होणार काय? व आमच्या वॉर्डाची कामे या आर्थिक वर्षात होणार काय?

प्रभारी आयुक्त यांनी खुलासा केला की, सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. आढावा घेण्याचे काम चालु असून १-२ दिवसात अंतिम टप्प्यात आहे.

मा.श्री.कृ.द.जाधव - मागील वर्षाच्या निधीचा पैसा उपलब्ध आहे. त्याच निधीमधून कामे करावीत. यावर मा.प्रभारी आयुक्त यांनी खुलासा केला की, जी कामे मंजूर आहेत ती होणार आहेत. ती रोखलेली नाहीत. त्यावर मा.श्री.जाधव यांनी सांगितले की, बोर्डात जे विषय होतात त्याची अंमलबजावणी होत नाही.

२) मा.श्री.दिपक सुळ - प्रत्येक सदस्यांना ३ लाखाचा निधी दिलेला आहे. प्रशासनाने ५० लाख निधी सुचविलेला असताना रु.२ कोटीचा निधी केला. तो थकबाकी देण्यासाठी खर्च करणार काय?

३) मा.श्री.कृ.द.जाधव - २०-२० वर्षाची थकलेली बीले देण्यात आलेली आहेत.

४) मा.श्री.दीप चव्हाण - स्थायी समितीने रु.५० लाखाचा निधी केला असता स्थायी समितीच्या शिफारशीचा विचार करण्यात आला नाही. श्री.सुळ तुम्ही याबाबत सभेत का विचारले नाही?

५) मा.श्री.दिपक सुळ - भुसंपादनाचा निधी वर्ग केला आहे तो परत करण्यात यावा.

६) मा.श्री.कैलास गिरवले - इतिवृत्त दुरुस्त करता येत नाही व ठराव रद्द करता येत नाही असे सांगितले होते. मात्र चुकीचे इतिवृत्त लिहीले असल्यास व चुक झालेली असल्यास दुरुस्ती करता येते.

यावर मा.प्रभारी आयुक्त यांनी सांगितले की, सभेच्या वेळी सभागृहामध्ये जे ठरलेले आहे त्यामध्ये विसंगत लिहीले गेले असेल तर त्यामध्ये बदल होईल असे सुचविले.

७) मा.श्री.अभय आगरकर - महापौर निधी कसा बदलता येतो आकडे बदलू शकत नाही. बजेट मंजुर केले ते ठीक आहे. परंतु नगरसेवकांनी ज्या भुमिका मांडल्या आहे ते स्पष्ट सांगावे. जो बदल केला आहे त्याची आम्हाला माहिती दयावी.

८) मा.श्री.दीप चव्हाण - कुणी काय सुचविले ते सांगावे.

९) मा.श्री.अभय आगरकर - प्रशासनावर आरोप नाही. जी संदिग्धता असेल ती दुर करावी असे मत आहे. जे काही झालेले असेल ते स्पष्ट करावे. व जे काही ठरले असेल ते सभागृहापुढे मांडले जावे. महापौर निधी कमी का झाला? महापौरांनी रुलींग दिल्यानंतर बदलता येते काय?

१०) मा.श्री.मिलींद गंधे - १५५ कोटी देणे आहे. असा शेरा मारलेला आहे. याबाबत प्रशासनाने खुलासा करावा.

११) मा.श्री.कैलास गिरवले - दुरुस्त्या करता येतात तर का करीत नाही?

१२) मा.श्री.सुरेश शेळके - मागील देणे देउन बजेट मंजूर केले होते.

१३) मा.श्री.अशोक कानडे - निधी कोठे खर्च केला त्याच प्रोव्हीजनवर खर्च झाला पाहिजे.

मा.प्रभारी आयुक्त - निधीला कात्री लावलेली नाही. निधीमधील जी बीले येतील त्याप्रमाणे खर्च करावा लागतो. मागील वर्षापर्यंतची १ ते दिड कोटीची बीले शिल्लक आहेत.

१४) मा.श्री.मिलींद गंधे - एवढे मोठे देणे आहे तर विकास कामे करु नका.

१५) मा.श्री.कैलास गिरवले - महापौर निधीतून बीले काढतात ते बेकायदेशीर आहे. सन २००४-०५ चे बजेटमध्ये सुधारणा करणेत आली आहे. यावर प्रभारी आयुक्त यांनी खुलासा केला की, दुरुस्ती करता येत नाही. मागील वेळी चर्चा करुन जे निर्णय घेतले आहेत ते चुकीचे लिहीलेले असतील तरच त्यात दुरुस्ती करता येते.

मा.महापौर - बजेट मध्ये रिॲप्रोप्रिएशनमध्ये ३ लाख निधी केलेला आहे. प्रभारी आयुक्त यांनी सांगितले की, आकडेवारी बघून कोणत्या हेडवर किती बजेट शिल्लक आहे ते पाहून काही कामे मंजुर झालेली आहेत. वर्कऑर्डर देउनही काम सुरु अथवा पूर्ण झालेली नाही. त्यावर मा.श्री.सुळ व गिरवले यांनी अशी कामे कॅन्सल करणेचे सुचविले. प्रभारी आयुकत यांनी सांगितले वर्कऑर्डर देउन ३ महिने पूर्ण झालेले आहेत व काम सुरु केले नाही अशांची यादी करावी. व काम रदद झाल्याचे पत्र दयावे. अशा कामाबाबत २ दिवसात माहिती देउ असे सांगितले. तथापी सदर वेळी सभागृहामध्ये गोंधळ झाला.

१६) मा.श्री.अनंत जोशी - कै.बा.दे.दवाखान्यामध्ये लिफट बसवावी अशी सुचना कोणी मांडली? यावर मा.सौ.सत्रे, सभापती,महिला बालकल्याण समिती यांनी सांगितले की, कोणीतरी याबाबत सुचना केली त्यावेळेस मीच म्हणाले हे काम महिला बाल समितीच्या निधीतून करावे. त्यावर श्री.जोशी यांनी सांगितले की, दवाखान्यामध्ये सर्व सुविधा झाल्याशिवाय लिफट बसवू नये. मात्र सोलर बंब बसवावा. तसेच सावेडी भागामध्ये भुयारी गटार योजनाबाबत तरतुद करावी.

१७) मा.श्री.कृ.द.जाधव - कामाची आवश्यकता, झालेली कामे याबाबत चौकशी करुन अहवाल दयावा. बा.दे.दवाखाना दुरुस्ती करावी. न झालेल्या कामाची कोणती बीले मिळाली हे पुढील मिटींगमध्ये माहिती दयावी. याबाबत मा.प्रभारी आयुक्त यांनी खुलासा केला की अशी प्रकरणे असतील तर त्यावर कारवाई केली जाईल.

१८) मा.श्री.दीप चव्हाण - दि.१४-१२-०५ रोजीच्या मिटींगमध्येच यावर चर्चा झाली असती. बजेटचा खरा विषय त्याच मिटींगपुढे होता.

यानंतर महापौर निधीमधील झालेल्या कामाची यादी वाचून दाखविण्यात आली. यावर मा.महापौर यांनी सांगितले की, याची यादी आपण बोर्डावरही लावू शकतो. १० लाखाची खेळणी बसवली हा संशोधनाचा विषय आहे.

मा.श्री.दीप चव्हाण - महापौर निधीमधून वेगळया कामांची तरतूद केलेली होती. सन २००४-०५ मध्ये जकात हेडवर २४ कोटी ८५ लाखाची तरतूद होती. बजेट मध्ये नवीन हेड करता येत नाही. व पुरवणी बजेट तरतुद करता येत नाही. जकात बजेट तरतूद झिरो होती. ती वाढविता येते काय? बजेट नामंजूर केलेले होते.

प्रभारी आयुक्त यांनी खुलासा केला की, शासनाचे मंजुरीनुसार कलम १०४ नुसार कार्यवाही पूर्ण केली आहे.

१९) मा.श्री.आसाराम कावरे - मागील वर्षी जकात नसताना आम्हाला १० लाख रुपये दिले. प्रत्येक नगरसेवकाला ३ लाख निधी देता. ३ लाखात काहीच होणार नाही. आमच्या वॉर्डात यादयाप्रमाणे कामे होत नाहीत. आमच्या वॉर्डातील निधी दुसरीकडे खर्च केला.

२०) मा.श्री.सुनिल त्रिपाठी - वॉर्ड नं.५ मधील ड्रेनेज लाईनला पैसे मिळत नाही. श्री.दीप चव्हाण यांनी वाचलेल्या कामातील केलेले काम कोठे गेले.

२१) मा.श्री.अशोक कानडे - एखादे काम दोन घरासमोरासमोर असतील तर त्याला एवढा मोठा खर्च आला असेल तर त्याचीही चौकशी व्हावी. त्यावर श्री.सोनटक्के इंजि. यांनी खुलासा केला की, त्यात इतरही बाबींचा समावेश आहे.

यावर मा.महापौर यांनी सांगितले की, आपल्या सुचनांची दखल घेउ.

२२) मा.श्री.उडाणशिवे - अण्णाभाउ साठे यांच्या प्रतिमेबाबत मा.आयुक्त, नाशिक विभाग यांचेकडून आलेल्या पत्राबाबत विचारणा केली. यावर मा.महापौर यांनी सांगितले की, हा सभेचा विषय होउ शकत नाही.

नंतर मा.श्री.कावरे यांनी वाडीयापार्क येथे म.गांधी आणि लोकमान्य टिळक यांचे पुतळे पुर्ववत बसविणेबाबत मागणी केली. यावर मा.महापौर यांनी याबाबत क्रिडा संकुल समितीला पत्र दिल्याचे सांगितले. त्यावर याबाबत क्रिडा संकुल समितीकडे पाठपुरावा केला जाईल, असे प्रभारी आयुक्त यांनी सांगितले.

<u>विषय क्र .३ -</u> नवीन सुधारीत निवृत्ती वेतन योजना.

१) मा.श्री.अभय आगरकर - यांनी सदरच्या विषयाबाबत सविस्तर माहिती दयावी व सदरचा शासन निर्णय लागु केल्यानंतर काय परिणाम होणार आहे. महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. कर्मचा-यांना काय त्रास होणार आहे. नवीन जी.आर.मुळे जुन्या कर्मचा-यांच्या पेन्शनमध्ये फरक होणार आहे काय?

२) मा.श्री.दीप चव्हाण - शासन परिपत्रक माहितीसाठी सभेपुढे ठेवण्यात आलेले आहे. त्याची माहिती आम्ही घेतली आहे. मात्र त्यास मंजुरी आहे असे समजू नये.

<u>विषय क्र .५</u> - रस्ते विकास.

१) मा.श्री.दीप चव्हाण - सुरुवातीस सभागृहामध्ये सदस्य संख्या कमी झाली असल्यामुळे कोरम आहे किंवा नाही याबाबत शंका उत्पन्न केली. सदस्य संख्या १९ आहे असे त्यांनी सांगितले. कायदयाने कामकाज चालले पाहिजे असे सुचविले असता सदस्य संख्या कमी दिसल्यामुळे मा.महापौर यांनी ठिक ४.२५ वाजता ५ मिनीटे सभा तहकूब केली. त्यानंतर परत ४.३० वाजता सभा सुरु झाली.

२) मा.श्री.कृ.द.जाधव - ४ रस्त्यांची कामे मा.श्री.देवरा, आयुक्त तथा प्रशासक असताना हाती घेतली होती. सिध्दीबाग ते अप्पु हत्ती या रस्त्यासाठी काढलेली रुंदी, ३-४ फुटासाठी शॉपींग सेंटर उध्वस्त करु नये, सिध्दीबाग गार्डनकडील भागात रुंदी वाढवावी त्यामुळे बाजारपेठही वाचेल. कारण शॉपींग सेंटरमधेही गाळे मागे जागा नसल्यामुळे सरकू शकत नाही. याचा विचार करावा. आयुर्वेद मागील रस्त्याचे काम ठेकेदाराकडून करुन घ्यावे.

३) मा.श्री.कैलास गिरवले - पूर्वी ४ रस्त्याचा विषय घेतलेला होता. परत अशा प्रकारे विषय घेउन वादग्रस्त ठरु पहात आहे. स्थायी समितीमधे सक्कर चौक ते आयुर्वेद कोपरा चौक या रस्त्यावर ८ लाख ८ हजाराच्या जादा कामास मंजुरी दिलेली आहे. या कामाची गरज नव्हती. या रस्त्याचे काम मागेच झाले असताना आता १ वर्षाने स्थायी समितीपुढे का पाठविले? बोगस एस्टीमेट त्यास मंजुरी देउ नये. यावर प्रभारी आयुक्त यांनी सांगितले की, कामाची चौकशी केली जाईल व काम झाले नसेल व कामाचा चुकीचा रिपोर्ट दिलेला असेल त्याबाबत कारवाई केली जाईल. याबाबतचा ऑफिस रिपोर्ट काय आहे, तो वाचून दाखवावा. यावर मा.महापौर यांनी सांगितले की, काम करण्याची गरज का भासली याचा खुलासा करावा. यावर इंजिनिअर यांनी खुलासा केला की, काम करुन घेण्यात आले आहे. काम करावयाचे नाही. मुळ अंदाजपत्रकात तरतुद केली नव्हती. गटाराची तरतूद केली नव्हती.

काम झालेले नाही असे सांगितले मात्र ते काम तपासून घेउ असे प्रभारी आयुक्त यांनी सांगितले.

४) मा.श्री. दिपक सुळ - पूर्ण चौकशी झाल्याशिवाय मंजुरी देउ नये.

५) मा.श्री.दीप चव्हाण - दि.१९ तारखेला विषय झालेला आहे. अंदाजपत्रकातील बचतीमधून ८ लाखास मंजुरी मागितली. तरतूदच नसताना बचत राहील कशी? खडीकरणाचे बील ७३ लाख अंदाजे केलेले आहे. स्थायी समितीमध्ये आम्ही विरोध केलेला आहे. सदर काम हे ७९ लाखाचे झालेले आहे काय?

सौ.अनिता आगरकर नगराध्यक्षा असताना ८० लाखाचे डांबरीकरणाचे एस्टीमेट मंजूर करण्यात आले होते. एकाच कामामध्ये सन २००२ पासून किती पैसे खर्च करावयाचे ठरलेले आहे किंवा कसे? याचा खुलासा करणे आवश्यक आहे. बोगस काम झालेले आहे. संबंधीतावर योग्य ती कार्यवाही करावी.

६) मा.श्री.त्रिपाठी - या विषयास आम्ही स्थायी समितीत विरोध नोंदविलेला आहे.

७) मा.श्री.दिपक सुळ - याबाबत कामाची चौकशी करावी. जास्त काम झालेले असले तरी बील देण्याची जरुरी नाही.

८) मा.श्री.कैलास गिरवले - रस्ते विकासाचे १५-१६ कोट रुपयाचे काम करीत आहोत. हे काम करीत असताना इतर कामे असतील त्यासोबत इतर अनुषंगिक कामे करणे जरुरीचे आहे. जेथे ड्रेनेज लाईन नाही तेथे करावी लागेल. कर्ज घेउन कामे करणार आहोत. १०% सुपरव्हिजन मागीतलेले आहे. कर्ज घेउनच काम करावयाचे असेल तर सावेडी भुयारी गटार योजनेसाठीही कर्ज घेउन मार्गी लावावे व नंतरच रस्त्याच्या कामाचा विचार करावा. या कामास प्राधान्य दयावे. तोपर्यंत हा विषय तहकूब ठेवावा.

९) मा.श्री.अशोक कानडे - शहर विकास व शहर सुधारणा झाली पाहिजे असे सर्वांनाच वाटते. जे चार रस्ते निवडण्यात आलेले आहेत ते योग्य वेळी निवडलेले नाहीत असे वाटते. मागील अडीच वर्षाच्या कालखंडामध्ये एकही भरीव काम करु शकलो नाही. उपनगरात ड्रेनेज नाही, रस्ते नाहीत, ज्या पध्दतीने शहराचा अभ्यास व्हावयास पाहिजे त्यापध्दतीने अभ्यास झालेला नाही. रस्ते कोणत्या पध्दतीने निवडलेले

आहेत ते सुसंगत निवडलेले नाहीत. त्याचे नियोजन नाही. लोकांना याची आवश्यकता आहे काय? रस्त्यावरील मुळ समस्या कायम आहेत. हागणदारी समस्या मुक्त होणे आवश्यक आहे. उपनगरातील ड्रेनेजचा प्रश्न २५ ते ३० वर्षापासून बाजूला ठेवला गेला आहे. मुलभूत समस्यांचा विचार व्हावा. हददवाढीतील पाणी तसेच रस्त्याचा प्रश्न असेल, सामान्य नागरिकांचे प्रश्न सुटत नाही. तरी सदरचा घेतलेला विषय तहकूब ठेवून भुयारी गटारींचा प्रश्न प्राधान्याने घ्यावा.

यावर मा.महापौर यांनी खुलासा केला की, सदर रस्त्याचा विषय यापूर्वी ३ वेळा सर्व साधारण सभेपुढे आलेला आहे.

१०) मा.श्री.अनंत जोशी - काम होणा-या रस्त्यांचा सिक्वेन्स नाही. गुलमोहर कोठे, पाईपलाईन कोठे. येथे प्रामुख्याने ड्रेनेज नसल्याने नागरिक शिव्या देतात. आजच हे रस्ते घेतले पाहिजे असे नाही. पॅचींग होत नाही. हा विषय तहकूब ठेवून भुयारी गटार योजना हाती घ्यावी. रस्ते विकास महामंडळामार्फत रस्ते करण्यास आमचा विरोध नाही. पण वेळोवेळी आम्ही केलेल्या सुचनांचा विचार व्हावा. त्याचा अंतर्भाव झ ालेला नाही. पाणी, रस्ते, ड्रेनेज इत्यादीचा विचार व सर्व्हे करावा. बेसिक इन्फ्रास्ट्रक्चर व्हावयास पाहिजे.

गिडॉन कंपनीने काम अर्धवट सोडले असेल तर त्यावर काय कार्यवाही केली? त्याला नोटीस दिली काय? श्री.अडिवरेकर यांचेशी चर्चा करुन ४ कलमी योजना दिली आहे त्यावर विचार केला नाही. वर्ल्ड बँकेकडून काम करुन घ्या. एमएसआरडीसी यांचेकडे सुपरव्हिजन देणेचे कारण नाही. रस्ते करताना अतिक्रमण, ड्रेनेज, पाईपलाईन करणेची जबाबदारी ही महापालिकेची आहे.

११) मा.श्री.सुनिल त्रिपाठी - आर्थिकदृष्टया सक्षम झाल्यानंतर विचार करावा.

१२) मा.श्री.दीप चव्हाण - १६-६-०५ च्या मंजुरीचा ठरावा वाचावा. (ठरावाचे वाचन करण्यात आले.) सदर मंजुरी दिली असताना हा विषय परत का आला गेला? अमरधाम कोपरा पासूनच्या रस्त्याचे बी १ टेंडर दिलेले आहे. वर्कऑर्डर दिलेली आहे. हा रस्ता घेता येत नाही. रस्त्याची घनता पात्रता काय आहे? कोणी प्लॅन काढलेले आहे, दिलेले प्लॅन एस्टीमेट अभ्यासपूर्ण नाही. एमएसआरडी मंडळ आपल्याकडून सर्व कामे करुन घेणार आहे. मग ते काय करणार. या कामावर प्रशासनाने पैशाची उधळपटटी करु नये. सिटी इंजिनिअर सारखे आणखी ४ अधिकारी घ्यावे व आपणामार्फत काम करावे. आपल्याकडे असलेल्या अधिका-यांचे काय काम आहे? त्यांना कामे करु दया. दिड कोटीचे टक्केवारी चार्जेस देणेपेक्षा ४ पीडब्ल्यूडी इंजिनिअर वर्षभरात काम करु शकतील. श्री.देवरा साहेब प्रशासनाधिकारी असताना ४ रस्ते अपुरे ठेवलेले आहेत त्याचे काय? एमएसआरडी कडून डिझाईन घ्यावे. यापूर्वी एमएसईबीकडे पोल हटविणेसाठी पैसे भरलेले असून पोल हटविले गेले नाहीत. कामाबाबत एमएसआरडी कडून तांत्रिक सहाय्य घ्यावे. यापूर्वी एकदा ठराव करुन दिलेला आहे. त्यावरच कार्यवाही करावी. सदरचा विषय तहकूब करावा. पूर्वीच्या रस्त्याचे कामाबाबत टर्मिनेशन नोटीस देणे आवश्यक आहे. अन्यथा यास प्रशासन जबाबदार राहील सभागृह जबाबदार राहणार नाही, असे सुचविले.

मा.महापौर - आपण कर्ज घेउन काम करावे असे श्री.लखीना यांनी सांगितले होते. याबाबत पूर्वी मिटींग झालेली होती व एमएसआरडी ने ठराव मंजूर केलेला होता. नगर शहराचा विकास होउ शकणार नाही.

शेवटी मा.महापौर यांनी विषय रद्द केला आहे, असे सांगितले.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

शुकवार दि. २१-४-२००६ रोजी दुपारी १=०० वाजता महानगरपालिका सभागृहांत होणां-या सर्व साधारण सभेपुढील विषय पत्रिका.

१. मागील दिनांक ३१-१-२००६रोजीच्या सर्वसाधारण सभेचे व दि.२०-२-०६ च्या खास सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

२. दुखवटयाचे प्रस्ताव.

३. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अधिन अहमदनगर महानगरपालिका सभा नियम , विधी नियम, उपविधी , स्थायी आदेश , समित्यांचे कामकाज व कार्यपध्दती बाबत तयार केलेले नियम अखेर मंजुरीसाठी.

४. अहमदनगर महानगरपालिका शाळा नं.११ मा.जिल्हा न्यायालयास भाडेतत्वावर देणे बाबत पारित झालेला महानगरपालिका ठराव क्रमांक १० दि.१४-१२-२००५ चा फेरविचार होणे बाबत मा.श्री.कानडे अशोक नाथा व इतर ६० सदस्य यांनी स्वाक्षांकित केलेली यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट कार्योत्तर मंजुरीसाठी.

५. अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीचे सि.स.नं.५१६१ अ / ७ अ / १ ( बेग पटांगण ) येथे खाजगी करणाने " बांधा,वापरा व हस्तांतरीत करा " ( BOT ) " अर्थ सहाय्य करा,बांधा, व हस्तांतरीत करा " ( FBT ) या तत्वावर व्यापारी संकुल व कार्यालयीन कक्ष बांधणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

६. ४ रस्ते

७. अहमदनगर शहराच्या वाढीव हद्यीची प्रारुप विकास योजना प्रसिध्द करणे बाबत ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव.

८. अहमदनगर महानगरपालिका शहर हद्यीमध्ये केंद्र शासनाच्या अनुदानातुन प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम राबविणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

९. महालक्ष्मी उद्यानातील मत्स्यालय (बी.ओ.टी.) बांधा,वापरा,व हस्तांतरित करा या तत्वावर चालविण्यांस देणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

१०. अहमदनगर महानगरपालिकेच्या सिध्दीबाग व्यायाम शाळेस कै.दत्तु खलिफा व्यायामशाळा नांव देणें बाबत ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव.

११. माणिक चौक ते भिंगारवाला चौक दरम्यान असणां-या एकमुखी दत्त मंदिर समोरील परिसरास " श्री एकमुखी दत्त चौक " असे नामकरण करणे बाबत मा.सर्वश्री.संजय चोपडा,सदस्य व मा.किशोरकुमार बोरा,सदस्य ,यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट

१२. श्रीमती.हेमलता निलेश साळवे, ज्यु.क्लार्क पदावर अहमदनगर महानगरपालिकेतुन पुणे महानगरपालिकेत बदली बाबत.

१३. मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज.

मा.महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक : १३-४-२००६.
अहमदनगर.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.